PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES Vol 1, Issue 1

# अहीर, जाट, गुजर, राजपुत व मराठा परस्पर संबंध

**प्रा. विशाल अशोक आहेर**
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास विभाग)
के. एच. कॉलेज, गारगोटी ता. भूदरगड
जि. कोल्हापूर पिनकोड-४१६२०९ **महाराष्ट्र**

**प्रस्तावनाः—**

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे भाषा,प्रांत,जात,धर्म,पोशाख,राहणीमान,इ.बाबतीत भेद असले तरी आपण सारे भारतीय आहोत असे आपण अभिमानाने म्हणतो.असे असले तरी सदयस्थितीत अनेक प्रकारचे भेद निर्माण करून एकत्वाला तडा देण्याचा प्रयत्नही केला जातो.प्रस्तूत लेखातून संशोधकाने भारताच्या विस्तृत भुमीत बहूसंख्येने पसरलेल्या अहीर,जाट,गुजर,राजपुत,मराठा या प्रमुख लढाउ वा शेतकरी जातींच्या परस्पर संबंधाआधारे सामाजिक एकात्मतेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.इतिहास हा भिन्नत्व दृष्टिकोण डोळयासमोर ठेवून लिहिण्याऐवजी एकात्मिक दृष्टिकोण समोर ठेवून लिहिल्यास भारताचे भवितव्य बदलणे,व एक सुजलाम सुफलाम भारताची निर्मिती करणे शक्य होईल.

## अहीर(यादव)

**ठाकुर देशराज –प्रसिद्ध जाट इतिहासकार म्हणतात. ''हमारा अपना तो ये खयाल है की भारत की मौजुदा क्षत्रिय जातीयोमे अहिर सबसे पुराने क्षत्रिय है जब तक जाट ,गुजर ,राजपुत ,मराठा इनकी सृष्टी भी नही हुई थी ,अहिरोंका अभ्युदय हो चुका था''[१].**

आभीर या लोकसमुहाची माहिती विभिन्न ऐतिहासिक व धार्मिक ग्रंथ तसेच प्राचीन अभिलेख,व व नाणी इ.विभिन्न ऐतिहासिक आधारातुन प्राप्त होते.आभीरांनाच यादव ,गोप, ग्वाल,अहीर,अयार,गोल्ला,घोष,राव,रावत इ.विभिन्न नावाने संबोधले जाते .रामायण,महाभारत,हरिवंश,विष्णुपुराण,पदमुपुराण,भागवतपुराण,नंदवंशप्रदिप,शक्तीसंगमतंत्र इ.प्राचीन धार्मिक ग्रंथात तसेच कौटिल्याचे अर्थशास्त्र,पतजंलीचे महाभाष्य,विष्णुशर्माचे पंचतंत्र,भरतमुनीचे नाटयशास्त्र,टॉलेमीचे द पेरीप्लस ऑफ द एरिथ्रीअन सी,शुद्रकाचे मृच्छकटिकम,तमिळ भाषेतील शिल्लप्पदिकारम, अमरकोश इ.प्राचीन काळातील ग्रंथांबरोबरच मध्ययुगातील अनेक ऐतिहासिक ग्रंथांमध्ये आभीरांचा उल्लेख येतो.[२]

आभीर अथवा अहीर समाज प्राचीन काळापासुन भारतातील विभिन्न प्रांतात पसरलेला दिसुन येतो .पंजाब व हरियाणापासुन अहीर –आभीर समाजाचे स्थलांतरण पुर्वेकडे उत्तर प्रदेश,बिहार ,नेपाळ ,पश्चिम बंगाल ,मध्यप्रदेश ,छत्तीसगडकडे तर राजस्थान ,गुजरात ,यामार्गे दक्षिणेकडे ते महाराष्ट्र ,आंध्रप्रदेश,कर्नाटक ,केरळ व सुदुर दक्षिणेकडे तमिळनाडु पर्यंत जाउन पोहचले त्या प्रदेशांमध्ये त्यांनी आपल्या असंख्य राजवटींची प्रस्थापना केली.[३] महाभारतकाळात पांडय राजांबरोबर दक्षिणेत गेलेले अहीर तेथे अयार म्हणून ओळखले जातात व त्यांच्या समृद्ध संस्कृतीचे वर्णन शिलप्पदिकारम यासारख्या तमिळ साहित्यिक ग्रंथात येते.[४]मथुरेची आठवण म्हणून तेथे त्यांनी मदुराई वसविले.[५] व त्याबरोबरच गोपालन ,भागवत संप्रदाय ,कृष्णभक्ती चा प्रसार व प्रचार केला तसेच भाषा,कला,साहित्य ,नृत्य ,नाटय

इ.अनेक क्षेत्रात बहुमोल योगदान दिले आहे.असा हा लोकसमुह महाभारत कालखंडात मथुरेपासुन दक्षिणेकडे गुजरात खान्देशात मोठया प्रमाणात पसरला होता. महाभारतात आभीरांचा उल्लेख यादव, गोप असा करण्यात आला आहे.[६]

महाभारतात यादवांच्या १८ शाखांचे वर्णन येते त्यातील आभीर ही शाखा प्रभावी ठरल्यामुळे उत्तर काळात आभीर हा यादव या शब्दास पर्यायवाचक शब्द बनला.[७]पदमपुराणात भगवान विष्णु म्हणतात **हे मथुरेतील अहिरांनो माझा आठवा जन्म तुमच्यात होइल**.[८]त्या प्रमाणे कृष्ण रूपात त्यांचा मथूरेतील अहीर समाजात जन्म झाला.आजही मथूरेत अहीर लोकांचे प्राबल्य असून पारंपारीक गोपालन व शेती हा त्यांचा प्रमूख व्यवसाय आहे.भारतातील सर्व अहीर आपले मुलस्थान मथूरा मानतात. श्रीकृष्ण मथुरेहुन द्वारकेला आले त्यांच्याबरोबरच अहिर वा यादव समाजाचेही दक्षिणेत आगमन झाले.आजही हरियाणा, राजस्थान, गुजरात, खान्देश या प्रांतात हा समाज मोठया प्रमाणात आढळतो.खान्देशला आभीर देश वा अहिर देश असेही म्हणतात.खान्देशात देवगिरीच्या यादवांना अहीर राजे असे म्हणत.[९]

भारतात अहीर वा यादव वंशातील लोंकांनी विभिन्न भागांमध्ये असंख्य राजवंशांची स्थापना केली.भारताबाहेरही मध्य आशिया वा युरोप या भागात अहीरांचे प्राचीन काळापासून अस्तित्व दृष्टिगोचर होते.मि.रेमेस्यूट यांचा दावा आहे की संपूर्ण मध्य आशिया यादवांची वसाहत आहे काळानुरूप अहीर वा यादव समाजातील काही वर्ग पंजाबमध्ये जाटांमध्ये,काही राजस्थानातील राजपुतांमध्ये तर काही अहीर वा यादव समाज गुजरातमध्ये गुजरवर्गामध्ये,तर महाराष्टात कुळरूपाने मराठयांमध्ये,कर्नाटक वा दक्षिणेकडे नायकांमध्ये विलिन झाला.या व्यतिरिक्त अहीर वा यादव समाज आपल्या मुळ रूपात उत्तर दक्षिण पसरलेला आहे आपल्या अनेक शाखा व उपशाखांची तसेच इतिहासाची यथायोग्य जाणीव असल्यामुळे ते समानता व बंधुता,भेदभाव विरहीत समाजव्यवस्थेचा अंगिकार करतांना दिसतात मग राजघराण्यातील अहीर-यादव असो वा मुळ शेती वा गोपालन करणारा अहीर-यादव असो त्याला अपवाद नाही.[१०]

**जाट**

**जाट इतिहासकार दलिपसिंह म्हणतात.''जाट और अहीर एकही परीवार या खानदान के लोग है अहीर जाती का प्रत्येक व्यक्ती नामके आगे यादव लगाता है और श्रीकृष्णजीको अपना देवता मानकर पूजा करता है.जाट लोग भी श्रीकृष्ण को अपना देवता मानते है.''**[११]

अहीर समाजाप्रमाणेच जाट समाजही इंडो-आर्यन मानला जातो.अहीर वा यादवांप्रमाणेच ते स्वतःला कृष्णवंशीय मानतात.अहीर वा जाटांची बरीचशी गोत्रे सारखीच आहेत भारताबाहेर जिथे जिथे अहीरांच्या वसाहती तिथे जाटांच्याही वसाहती दिसून येतात.इतिहासकार प्रायः जाटांना अहिरांचीच एक शाखा मानतात तसेच त्यांची उत्पत्ती एकाच पूर्वजापासून झाली असे प्रतिपादन करतात. महाभारताबरोबरच अन्य धार्मिक वाड.मयातही त्यांचा उल्लेख येतो.५ व्या शतकापासून त्यांचे ऐतिहासिक वर्णन प्राप्त होतात.पाणिनी ने जट या शब्दाचा प्रयोग केला आहे ज्याचा अर्थ संघ असा होतो.पंजाबात आजही जटट् वा जट असा शब्दप्रयोग अस्तित्वात आहे.जाट समाज भारताबाहेरही अनेक देशांमध्ये आढळतो.उदा.इराण,रोम,पाकिस्तान,अफगाणिस्तान,चीन इ.जाट लोकसमूह भारतामध्ये जाट हिंदू,जाट शीख,जाट मुस्लिम अशाप्रकारे विभागला जातो.प्रामुख्याने पंजाब व हरीयाणा या प्रांतात जाट बहुसंख्यांक आहेत.मध्यकाळात काही अहीर पंजाबमध्ये जाट समूहामध्ये सामिल झाले.जाटांनीही अनेक राजवंशाची स्थापना केली.महाराष्ट्रातील खान्देश विभागात जाटांची काही गावे आहेत.

**गुजर**

**जाट इतिहासकार दलिपसिंह म्हणतात.''इतिहासवेत्ता यह सिद्ध करते है की जाट,अहीर,गुर्जर,राजपूत सब एकही श्रेणी के लोग है.''[१२]**

अहीर,गुजर,जाट आपल्याला कृष्णाचे वंशज मानतात त्यांची गोत्रे,खानपान पद्धती यामध्येही समानता आहे तसेच इतिहासकारही तिघांचा उल्लेख यदुवंशी असा करतात.अहीर,जाट,यांच्याप्रमाणे गुजर हा लोकसमुहही मध्य आशियापासून उत्तर भारतात मोठया प्रमाणात पसरला आहे.अफगाणिस्तानाच्या राष्ट्रगाणामध्येही गुजर या जातीचे नाव येते.गुजरातवर गुजरांची सत्ता असल्याने त्याला गुजरात असे नामकरण पडले.गुजरातमधील पाटीदार वा पटेल समाज हा मुळ गुजर समाज होय.मध्यकाळात या प्रदेशातील अहीर व जाट समुह गुजरांमध्ये सामील झाला.५ व्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंत गुजरांनी भारताच्या विभिन्न भुभागावर राज्य केले.मध्ययुगात काही गुर्जर लोकसमुह शीख व मुस्लिम जातीत परिवर्तीत झाला.त्यामुळे गुजरांमध्ये हिंदू गुजर,शीख गुजर,मुस्लिम गुजर असे प्रकार पडतात.खान्देशातील जळगाव जिल्हयामध्ये गुजर मोठया प्रमाणात आहेत. शिवाजी महाराजांचे सरसेनापती प्रतापराव गुजर हे मुळ गुजरवंशीय होते.

## राजपुत

राजपुतांच्या उगमाविषयी अनेक मतभेद असले तरी सामान्यपणे राजपुत्र या शब्दाचा अपभ्रंश होउन राजपूत हा शब्दप्रयोग केला जाउ लागला.राजस्थानात राजपुतांचा उगम झाला त्यामुळे या प्रदेशात वास्तव्य करणारे काही अहीर,गुजर,जाट समाजाचे लोक राजपुत वर्गात समाविष्ट झाले. राजपुतांमध्ये ३६ कुळांचा समावेश केला जातो त्यामध्ये अहीर,यादव,जाधव,गुजर ही कुळे आहेत.[१३] त्याचपमाणे काही जुन्या व नव्या कुळांचाही त्यामध्ये समावेश करण्यात आला आहे.७ व्या ते १२ व्या शतकापर्यंतचा कालखंड हा भारताच्या इतिहासातील राजपूत कालखंड म्हणून ओळखला जातो.७ व्या ८ व्या शतकात अनेक राजपूत घराणी दक्षिणेत राज्य करू लागले ते पुढे मराठा क्षत्रियात गणले गेले.

## मराठा

**यादव इतिहासकार मोहरसिंह यादव म्हणतात ''मराठोमे सुर्य एवं यदुवंश दोनोके वंशज मिले हुए है मराठोकी बहूत बडी संख्या यदुवंश से संबंध रखती है इनको यादव एवं श्रीकृष्ण का वंशज होने का बडा अभिमान है''[१४]**

**खान्देशातील इतिहासकार डॉ.दा.गो.बोरसे म्हणतात''देवगिरीच्या यादवांना अहीरराजे गवळीराजे असे म्हटले जाई जाडेजा व चुडासामा स्वतःला चंद्रवंशीय अहीर मानत होते अहीरांचे मुलस्थान भारत आहे आणि ते या मातृभुमीचे सपुत आहेत.''[१५]**

**महाराष्ट शासन गॅझेटिअर '' अहीर हे सिथियन वंशाचे असावेत अशी आजवरची समजुत होती मात्र ते आर्यच असावेत असे मानले जाते.''[१६]**

**जाट इतिहासकार ठाकूर देशराज म्हणतात'' मराठे दक्षिण पश्चिममे रहते है और जाट उत्तर पश्चिममे यदी यह सौभाग्य प्राप्त हुआ होता की इन दोनो जातीयोकी बस्तिया एकही जगह होती तो इसमे कोई संदेह नही की जाट और मराठोके एक जाती बनने का सुत्रपात अब तक हो जाता.[१७]**

राठी नामक गोत्र पंजाबातील जाटांमध्ये आहे.[१८] रठठ् वा राठी नामक लोकसमुहाचा उल्लेख इ.स.पु. ३ –या शतकात आढळतो सम्रट अशोकाने रट्ट नामक अधिकारी दक्षिणेत पाठविल्याचे उल्लेख मिळतात.गुजरातमध्येही राठी गोत्राचे क्षत्रिय आहेत.या रट्टांनाच महारठी वा महारथी असे म्हणत त्यावरूनच पुढे मराठा हा शब्द उदयास आला असावा.काही इतिहासकार या रठ्ठांना अहीर वा यादव मानतात.[१९]सम्राट अशोकाच्या मगध प्रदेश आजही यादव

बाहुल्य प्रदेश म्हणून ओळखला जातो.रामायण महाभारतकाळात अनेक क्षत्रियांनी दक्षिणेकडे वास्तव्य केले महाभारत काळात श्रीकृष्णाबरोबर अहीर,अंधक,वृष्णी,कुकुर,भोज इ. यादव समाजही खान्देशात येउन विसावला खान्देशातील एक विभाग अहीराणीपट्टी म्हणून ओळखला जातो.[२०] येथे १४ व्या शतकापर्यंत अहीर वा यादवांनी अनेक राजवंशांची स्थापना केली ३ –या शतकात ईश्वरसेन अहीर याची राजधानी नासिक असून त्याचे साम्राज्य गोंव्यापर्यंत पसरलेले होते.या साम्राज्याला अहीर देश वा महरट्ट देश असे म्हणत[२१].आसा अहीर– ब–हाणपूर,निंबा अहीर– थाळनेर,अंजनेरीचे गोप वा अहीरराष्ट्र,भामेर–लक्ष्मीदेव अहीर,नंदूरबार– नंद अहीर,देवगिरीचे यादव वा अहीर,बुलढाण्याचे जाधव, असा यादव समाज वेळोवेळी दक्षिणेकडे स्थलांतरीत झाला.व पुढे मराठा क्षत्रियात समाविष्ट झाला.[२२]प्राचीन काळापासून अनेक सुर्यवंशीय व चंद्रवंशीय क्षत्रिय महाराष्ट्रदक्षिणेत आले.पुढे शिवकाळात या क्षत्रियांची कुळांनुसार यादी करण्यात आली व त्यांचे गठन करण्यात आले तेच पुढे ९६ कुली मराठा म्हणून ओळखले गेले.यामध्ये अहीर,यादव,जाधव,अशी कुळे आहेत कुळ याचा अर्थ कुटुंब असा होतो अहीर कुळातील याचा अर्थ अहीर कुटुंबातील वा अहीर परीवारातील असा होतो.गुजर कुळातील याचा अर्थ मुळ गुजर कुटुंबातील असा होतो.तात्पर्य मराठा व अहीर समाजात घनिष्ठ संबंध आहे हे ऐतिहासिक,धार्मिक पुराव्यांवरून सिद्ध होते.[२३]त्याचप्रमाणे मध्ययुगात अनेक राजपूत घराणी महाराष्टात वास्तव्यास आलेली होती ती पुढे मराठा म्हणून ओळखली गेली.आजही खान्देशात अनेक मराठा घराणी स्वतःला राजपूत वंशातील समजतात तसेच राजस्थानातून स्थलांतरीत झाल्याचे प्रतिपादन करतात.आजही खान्देशात राजस्थानातून क्षत्रियांच्या वंशावळीची नोंद ठेवणारे भाट येतात व त्यांच्याकडे ८ वया ९ व्या शतकापासूनच्या वंशावळया मिळतात.हे भाट आपल्याला गावे वाटुन दिलेल्या घरी जातात त्या ठिकाणी त्यांचा आदरपुर्वक सन्मान केला जातो २ ते ३ दिवस खाण्यापिण्याची सोय केली जाते.या दरम्यान कुटुंबातील सदस्य मोठया उत्सूकतेने आपल्या पुर्वजांविषयाची माहीती समजावून घेतात[२४].अशा प्रकारे अनेक राजपूत घराणी पुढे मराठा वर्गात गणली गेली.

भारतभुमीचा विशाल आधारस्तंभ असणा–या अहीर–यादव,जाट,गुजर,राजपुत,मराठा या प्रभावी जातींमध्ये आपल्या इतिहासाविषयीची सुज्ञ जाण निर्माण झाल्यास अनेक सामाजिक समस्या सोडविण्यास मदत होईल त्यासाठी एकात्मिक इतिहास लेखनावर भर दयायला हवा.आणि म्हणूनच **यादव इतिहासकार जयनारायणसिंह यादव** म्हणतात.''**अहीर,जाट,गुजर,राजपूत,मराठा आदी मिलकर एक कुल की स्थापना कर सकते है जैसे अजगरकूलम्... इन जातियोकी एक सभ्यता है और समय अधिक दूर नही जब ये जातिया फिर नवीन संगठन बनाकर देश और समाज को नयी दिशाए दे सकती है.''**[२५]

## संदर्भसुची:

[१] ठाकूर देशराज ; (1934) जाट इतिहास दिल्ली :महाराजा सुरजमल शिक्षा संस्थान पान नं.168

[2] पाण्डे डॉ. राजबली (2004 ) यदुवंश का इतिहास दिल्लीः यदुकूल प्रकाशन पान नं.321

[3] कुलकर्णी भा. र (1942) अहिराणी भाषा व संस्कृती शिरपूर : दि.ब.वाघमारे

[4] चांदोरकर पा. मा. (19) खान्देश व खान्देशी भाषा पुणेः भारत इतिहास संशोधन मंडळ

[5] मुलाखत प्रो.भास्करन पंडियन यादव कॉलेज मदुराई.8–04–2016

[6] Rao, M.S. A. 1987. Social Movement and Social Transformation. New Delhi: Manohar Publishers p-127

[7] पाण्डे डॉ. राजबली (2004 ) यदुवंश का इतिहास दिल्लीः यदुकूल प्रकाशन

[8] Walker Benjamin (1968) hindu world:an encyclopedic survey of Hinduism vol-1,allen&unwin

[9] चांदोरकर पा. मा. (1940) खान्देश व खान्देशी भाषा पुणेः भारत इतिहास संशोधन मंडळ पान नं.123

[10] मुलाखत महाराजा राव बिजेंद्रसिंह रेवाडी राजघराना 17–04–2016

[11] अहलावत दलिपसिंह (1989)जाट वीरोंका इतिहास पान.नं.526

[12] अहलावत दलिपसिंह (1989)जाट वीरोंका इतिहास पान.नं.526

[13] पारोळकर गंगाधर ;2004 द्ध आभीरायण पुणे : प्रकाश मुद्रणालय पान.नं.134

[14] यादव मोहरसिंह(2006) यदुवंश प्रताप ग्वालियर, पान नं.230

[15] बोरसे दा.गो. **(1940 ) "**अहिराणी लोकसाहित्याची वैशिष्टे **"** मालेगावः गिरीजा साहित्य प्रकाशन पृष्ठ क्र 5

[16] महाराष्ट्र शासन गॅझेटिअर – ''महाराष्ट्र भूमी व लोक मराठी आवृत्ती''

[17] ठाकूर देशराज ; (1934) जाट इतिहास दिल्ली :महाराजा सुरजमल शिक्षा संस्थान पान नं.168

[18] अहलावत दलिपसिंह (1989)जाट वीरोंका इतिहास पान.नं.526

[19] मुलाखत महाराजा राव बिजेंद्रसिंह रेवाडी राजघराना 17–04–2016

[20] कुलकर्णी भा. र (1942) अहिराणी भाषा व संस्कृती शिरपूर : दि.ब.वाघमारे

[21] महाराष्ट्र शासन गॅझेटिअर विभाग

[22] चांदोरकर पा. मा. (1940) खान्देश व खान्देशी भाषा पुणेः भारत इतिहास संशोधन मंडळ

[23] प्रा.आहेर व्हि.ए. आभीर शब्दमीमांसा भारतीय शोध समग्र पत्रिका 7 जुलै ,ऑगस्ट 2013 पृष्ठ 99–108

[24] रमेश भांडारकर मुलाखत 12–03–2016

[25] यादव जयनारायणसिंह(1990)यादवोंका बृहत इतिहास नारनौल :यादव इतिहास संशोधन केंद्र